**फौ.कि.अर्ज क्र.११/२०२६.**
**नि.१० पुढे सुरु.**

**<u>अर्जदार यांचा साक्षीपुरावा</u>**

मी रेणु स्वप्नील महाकाळकर शपथेवरती कथन करते की,

**<u>अर्जदार यांचा पुढील सरतपास ॲडव्होकेट श्री.पी.ए.पेटकर यांचेमार्फत–</u>**

१९. माझे सरतपास प्रतिज्ञापत्र **नि.९** मधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे व ते माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेले आहे. आता मला माझे आधारकार्डची कॉपी दाखवण्यात आली. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते. आता मला माझी जात प्रमाणपत्र दाखवण्यात आले. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते. आता मला माझे शाळा सोडल्याचा दाखला दाखवण्यात आले. त्यास **नि.क्र.१३** देण्यात येते. आता मला माझे लग्नाचे वेळेस गैरअर्जदार याने दिलेला बायोडाटा दाखवण्यात आला. त्यास **नि.क्र.१४** देण्यात येते. त्यामध्ये गैरअर्जदाराचे शिक्षण बॅचलर ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग असे दिलेले आहे. आता मला माझे लग्नाचे वेळेसचे भेटवस्तु यादी दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते. आता मला गैरअर्जदार याच्या विरुध्द दाखल केलेले पोलिस तक्रार दाखवण्यात आली. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. त्यानंतर मला पोलिसांनी दिलेला कलम १४९ अंतर्गत दिलेला नोटिस दाखवण्यात आला. हा तोच असुन त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. आता मला माझी व गैरअर्जदाराची लग्नाची पत्रीका दाखवण्यात आली. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

(उलटतपासणीकरीता गैरअर्जदाराचा पुकारा केला असता गैरहजर, प्रकरण गैरअर्जदारातर्फे एकतर्फा असल्याने उलटतपास काही नाही)

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/–

ठिकाण – वर्धा.
दि. ०४/०९/२०२६.

(वाय.ए.बावरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.५, जि. वर्धा.